No. of Printed Pages : 4

**एफ.एम.टी.-01**

**BDP / BCA / BTS**

# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

**सत्रांत परीक्षा**

**जून, 2015**

00656

**पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01**

*समय : 2 घण्टे* *अधिकतम अंक : 50*

***नोट :*** *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*

**1.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : *10*

(a) सार्वजनिक स्वच्छतेचे महत्त्व

(b) मला आवडलेले पुस्तक

(c) पाणी म्हणजेच जीवन

(d) स्त्रियांचे समाजातील स्थान

**2.** खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : *8*

(a) 'पिटू भक्तीचा डांगोरा' असे तुकाराम का म्हणतात ?

(b) केशवसुतांनी कवींचा मोठेपणा कसा सांगितला आहे ?

(c) मर्ढेकरांच्या कवितेमुळे मराठी कवितेत कोणते बदल झाले ?

(d) 'जुनी कथा' आणि 'नवी कथा' यातील फरक कोणता ?

3. खालीलपैकी कोणत्याही *दोन* प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(a) तात्या देसाई आणि त्याची कारभारीण यांना कोणती काळजी वाटत होती ?

(b) प्रल्हाद चेलम्याचे पाणी पिताना शेतातला माणूस त्याला का दम भरतो ?

(c) आकाश आणि कृष्ण यांच्यात शिरवाडकरांना कोणते साम्य आढळते ?

(d) कुंजा सांबराला का मारत नाही ?

4. खालीलपैकी कोणत्याही *एका* विषयावर टीपा लिहा : 6

(a) 'गुंड्याभाऊचे दुखणे' या कथेमधील विनोदाचे स्वरूप.

(b) आंबेडकरांच्या मते सामाजिक लोकशाही म्हणजे काय ?

(c) 'सारांश-लेखन' आणि 'कल्पना-विस्तार' यांची उद्दिष्टे.

(d) बातमी-लेखनाची वैशिष्ट्ये.

5. मराठीतील शब्दांचे आठ प्रकार (शब्दांच्या जाती) सांगून त्यातील कुठल्याही चार प्रकारांचे एक एक उदाहरण द्या आणि त्यांचा वाक्यात उपयोग करा. 5

**किंवा**

खालीलपैकी *एका* कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा :

(a) यत्न तो देव जाणावा

(b) काही गुण सोन्याचा काही सोनाराचा

(c) गाव करी ते राव न करी

6. खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : *3*

(a) तिलांजली देणे

(b) हात मारणे

(c) निगा राखणे

(d) तोंडाला पाणी सुटणे

(e) जिवाचे रान करणे

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) उथळ पाण्याला खळखळाट फार

(b) शेळी जाते जिवानिशी, खाणारा म्हणतो वातड

(c) दुरून डोंगर साजरे

(d) चार दिवस सासूचे, चार दिवस सुनेचे

(e) हातच्या काकणाला आरसा कशाला ?

7. खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : *4*

(a) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजासाठी कोणते कार्य केले ?

(b) चांगला नागरिक कोणास म्हणता येईल ?

(c) विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे मानवजातीला कोणते फायदे झाले ?

(d) पर्यावरणाचा नाश म्हणजे मानवजातीचा सर्वनाश कसा ?

**8.** खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : *4*

The atmosphere in Maharashtra and Pandharpur during the days of Sane Guruji's fast was electrifying. Social activists, writers, workers from Harijan Sevak Sangh flocked to Pandharpur. Leaders like S.M. Joshi, Raosaheb Patwardhan, Kakasaheb Barve made speeches everyday. On the ninth day of the fast the famous writer, dramatist, orator and film maker Acharya Atre, made a moving speech. He said, "Unless you allow Dalits to enter the temple, you have no right to enter the temple of freedom. The way to our freedom passes through the Pandharpur temple."

**9.** खालील उताऱ्याचा सारांश लिहा : *4*

मनाला केवळ आनंद देणे किंवा मनाचे निव्वळ रंजन करणे हाच कलेचा हेतू आहे असे नाही. सुंदर चित्र पाहिल्याने आपल्याला आनंद तर होतोच होतो, पण त्यामुळे आपली जीवनशक्ती अधिक समृद्ध होते. भावनांचा विकास होतो आणि बुद्धिची उत्क्रांती होते. कलेच्या उपभोगाने आपण अधिक सुखी, अधिक तृप्त आणि अधिक उन्नत होतो. म्हणूनच समाजाच्या आनंदासाठी, प्रगतीसाठी आणि उद्धारासाठी कलेची आणि कलावंतांची जरूरी आहे. हजारो वर्षांच्या काळात मानवजातीने प्रगतीचा आणि संस्कृतीचा जो टप्पा आज गाठलेला आहे, त्याच्या श्रेयाचा मोठा वाटा कलावंतांनाच द्यायला पाहिजे. कलावंतांची कला ही समाजासाठी आहे; आणि कलावंतांवाचून समाज हा रूक्ष आणि नीरस आहे.

———